Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 08 January 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

**दिनांक: ०८ जानेवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज आंध्र प्रदेशात विशाखापट्टणम इथं विविध विकासकामांचं लोकार्पण, उद्घाटन तसंच पायाभरणी होणार आहे. एकंदर दोन लाख कोटींहून अधिक किंमतीच्या या प्रकल्पांमध्ये पुडीमाडाका इथल्या राष्ट्रीय हरित हायड्रोजन मोहिमेअंतर्गत पहिल्या हरित हायड्रोजन हबचा समावेश आहे. त्यासाठी अंदाजे एक लाख ८५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. यामुळे पुढील पाच वर्षात भारताचं पाचशे गिगावॅट अजीवाश्म ऊर्जा क्षमता गाठण्याची लक्ष्यपूर्ती होणार आहे. याशिवाय, साडे एकोणीस हजार कोटी रुपये मूल्यांच्या विविध रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांचं उद्घाटन तसंच लोकार्पण, दक्षिण कोस्ट रेल्वे मुख्यालय, नक्कापल्ली इथं बल्क ड्रग पार्कची पायाभरणी, तर कृष्णपट्टमणम् औद्योगिक परिसराची पायाभरणीही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

****

रॉकेट आणि स्पेसक्राफ्ट तज्ञ डॉ. व्ही. नारायणन यांची भारतीय अंतराळ संशोधन संस्था–इस्रोच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. तर केंद्र सरकारकडून पुढील दोन वर्षासाठी अंतराळ विभागाचे सचिव पदावर देखील नारायणन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

****

१८ व्या प्रवासी भारतीय दिनाच्या संमेलनाला आजपासून भुवनेश्वर इथं सुरुवात झाली. यासाठी ५० देशांतून भारतात येणाऱ्या अनिवासी भारतीयांसमोर ओडिशा राज्याच्या समृद्ध संस्कृतीचं आणि वारशाचं प्रदर्शन मांडण्यात आलं आहे. ओडिशा सरकारने युवा कार्य आणि क्रीडा मंत्रालयाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या युवा प्रवासी भारतीय दिन कार्यक्रमाने संमेलनाची सुरुवात होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या, तर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू शुक्रवारी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी असतील. प्रवासी

भारतीय दिनासाठी यंदा 'विकसित भारतासाठी भारतीय समुदायाचं योगदान' ही मुख्य संकल्पना ठेवण्यात आली आहे.

****

आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी केंद्राकडून मिळणाऱ्या निधीचा उपयोग करून राज्यातली आरोग्य यंत्रणा सक्षम करावी, असे निर्देश केंद्रीय आयुष तथा आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिले. मुंबईत काल केंद्र शासनाच्या योजनांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यावेळी उपस्थित होते. आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा जास्तीत जास्त लाभ पात्र नागरिकांना देण्यात यावा, क्षयरोग मुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी नि:क्षय मित्र जास्तीत जास्त जोडण्यात यावेत, आदी सूचना जाधव यांनी दिल्या.

****

शिक्षण ही निरंतर प्रक्रिया असून, पदवी प्राप्त केल्यानंतर देखील ते आयुष्यभर सुरु असलं पाहिजे, असं प्रतिपादन राज्यपाल आणि विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. मुंबई विद्यापीठाच्या वार्षिक दीक्षान्त समारंभात ते काल बोलत होते. सर्व विद्यापीठांनी वर्षाच्या सुरुवातीलाच वर्षभराचं शैक्षणिक वेळापत्रक तयार करावं, ते विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावं आणि त्याची काटेकोरपणं अंमलबजावणी करावी अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. या दीक्षान्त समारंभामध्ये एक लाखांहून अधिक स्नातकांना पदव्या, ४०१ स्नातकांना पी. एचडी, तर १८ विद्यार्थ्यांना सुवर्ण पदकं प्रदान करण्यात आली. या समारंभाला उच्च, तंत्र शिक्षण आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, कौशल्य, रोजगार आणि उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

****

राज्यातला कारभार अधिक गतीमान आणि पारदर्शी करणं, मंत्रिमंडळातले निर्णय लोकांपर्यंत तातडीने पोहचवणं आणि त्याद्वारे शासकीय कामकाजाला गती देणं आणि सर्वसामान्यांचे प्रश्न जलदगतीने सोडवणं या उद्देशाने राज्यात ई-कॅबिनेट उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी काल मुंबईत मंत्रिमंडळ बैठकीनंतर याबाबतचे सादरीकरण केलं. ई-कॅबिनेट हा राज्य शासनाचा पर्यावरणपूरक उपक्रम आहे.

****

मुंबईत टोरेस या परदेशी कंपनीने गुंतवणूकदारांची जवळपास १३ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पोलिसांनी या कंपनीच्या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

केला आहे. गुंतवणूकदारांना १० टक्के परतावा देण्याचं आमिष दाखवून या कंपनीनं अनेकांकडून पैसे गोळा केले आणि त्यानंतर पसार झाले. आपली फसवणूक झाल्याचं लक्षात येताच गुंतवणूकदारांनी कंपनीच्या दादर इथल्या बंद कार्यालयासमोर आंदोलन केलं.

****

बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी काल जिल्हा विकास समन्वय आणि संनियत्रण समितीची बैठक घेतली. जिल्ह्यात सुरु असलेल्या विविध योजनांचा त्यांनी आढावा घेतला. आपण सर्व मिळून जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न करू, असं ते यावेळी म्हणाले.

****

धाराशिव इथं काल ‘वाचन संकल्प महाराष्ट्राचा’ या उपक्रमाचं उद्घाटन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात करण्यात आलं. हा उपक्रम सार्वजनिक ग्रंथालयांच्या माध्यमातून राबवला जात असून, यामुळे वाचकांना नवनवीन पुस्तकांच्या दुनियेशी ओळख करून देण्याचा प्रयत्न होणार आहे. तसंच सामूहिक वाचन कार्यक्रम, वाचन कौशल्य विकसित करण्यासाठी कार्यशाळा आणि लेखक, विद्यार्थ्यांमधल्या संवादासाठी विशेष सत्रे आयोजित केली जाणार आहेत. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात ग्रंथ प्रदर्शनही भरवण्यात आलं आहे.

****